जालना शहर महानगरपालिका, जालना

जाहीर आवाहन

क्रमांक : 728 दिनांक : 01/07/2026

**दैनंदीन /आठवडी बाजार व इतर मक्ता लिलाव – सन २०२६ ते २०२७**

जालना शहर महानगरपालिका जालना हद्दीतील सन २०२६–२०२७ या कालावधीसाठी दैनंदीन / आठवडी बाजार व इतर मक्त्यांच्या वसुली लिलाव बाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**अटी-शर्ती**

१) सदर लिलाव हा जालना शहर महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक जागा, रस्त्याच्या कडेला किरकोळ व्यवसाय करणारे व्यवसायिक, फळविक्रेते, फेरीवाले तसेच आठवडे बाजारात भाजीपाला विक्री करणारे विक्रेते यांच्याकडून दैनंदीन / आठवडी बाजार शुल्क वसूल करण्यासाठी असेल.

२) लिलावाची मुदत कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांकापासुन **३१.०३.२०२७** पर्यंत राहील.

३) लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने रु.५०,०००/- अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र धनाकर्ष (डी.डी.) द्वारे भरणे आवश्यक राहील त्याशिवाय लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही.

४) बोलीधारकाने पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. (आधार कार्ड व पॅनकार्ड, शॉप ॲक्ट परवाना, मागील तीन वर्षांचे आयकर परतावे, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, दोन पासपोर्ट फोटो, बे-बाकी प्रमाणपत्र).

५) लिलाव जिंकणाऱ्याने (०३) दिवसाचे आंत बोलीची संपूर्ण रक्कम (डी.डी.) धनाकर्षाद्वारे भरणे बंधनकारक राहील.

६) मुदतीत रक्कम न भरल्यास लिलाव रद्द होईल व फेरलिलाव करण्यात येईल.

७) अयशस्वी बोलीदारांची डिपॉझीट रक्कम लिलावानंतर ८ दिवसात परत करण्यात येईल.

८) निविदा मंजुर झालेल्या मक्तेदाराने मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका,जालना यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रक्कम रू.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक आहे. राहील.

९) वसुलीची पावती पुस्तके महानगरपालिकेच्या नमुन्यात व शिक्क्यासह छापून घ्यावी लागतील.

१०) वसुली फक्त आठवड्यातील बाजाराच्या दिवशीच करता येईल, मासिक/वार्षिक दराने वसुली करता येणार नाही.

११) एका विक्रेत्याकडून कमाल रु.३०/- प्रतिदिन शुल्क वसूल करता येईल.तसेच बाजाराच्या ठिकाणी जागा निश्चित करून बाजार सुरू होणा-या स्थळापासुन ते बाजार संपणा-या स्थळापर्यंत पार्कींगची व्यवस्था ही मक्तेदार यांना करून देणे बंधनकारक राहील.

१२) नैसर्गिक आपत्ती, वंद, हरताळ, किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्धवल्यास निविदाधारकास कोणत्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. कुठल्याही नैसर्गिक आपत्तीस हे कार्यालय जवाबदार राहणार नाही किंवा त्याची नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत दिली जाणार नाही व मक्तेदारास मा.न्यायालयात तशी मागणीही करता येणार नाही.

१३) नियमभंग, गैरवर्तन, थकवाकी किंवा कराराचे उल्लंघन झाल्यास मक्ता रद्द होईल व भरलेली रक्कम जप्त केली जाईल.

१४) लिलावधारकाने घेतलेला मक्ता महानगरपालिकेच्या आगाऊ परवानगीशिवाय इतर कोणास देता येणार नाही.

१५) बोलीधारकाने बोलीची रक्कम ही रू.१०,०००/- च्या पटीत बोलणे बंधनकारक राहील.

१६) वसुली मक्ता परिसरात स्वच्छता व सुरक्षीतता ठेवण्याची जवाबदारी ही निविदाधारकाची राहील.

१७) कोणत्याही अटी व शर्तीमध्ये वदल करण्याचा अधिकार तसेच कोणत्याही कारणामुळे वाद उद्धवल्यास याबाबतचा निर्णय हा मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका,जालना यांचा अंतिम निर्णय राहील व तो निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहील.

१८) सदरची निविदा अथवा निविदेतील कोणताही भाग तसेच निविदेसाठीच्या नियम व अटीमध्ये पूर्व सुचना न देता बदल करणे, वगळणे, रद्द करणे हे सर्व अधिकार मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका,जालना यांचे आहेत व राहतील.

१९) मक्तेदारास सदरचा मक्ता चालविण्याकरीता मक्त्याच्या ठिकाणी स्वतःचा कुशल कर्मचारी वर्ग नियुक्त करावा लागेल त्याकरीता या कार्यालयामार्फत कुठलाही कर्मचारी वर्ग पुरविला जाणार नाही.मक्त्याच्या कार्यक्षेत्रात / परिसरात कुठल्याही प्रकारची दुर्घटना किंवा आर्थिक नुकसान अथवा जिवित हानी झाल्यास त्याची जवाबदारी संबंधित मक्तेदाराची राहील.

२०) मंजुर मक्तेदराच्या ताब्यात देण्यात येणारी जंगम अथवा स्थावर मालमत्ता (मशिनरी, इमारत, खुली जागा इत्यादी ) ज्या स्थितीत मक्तेदारास हस्तांतरीत होईल त्याच स्थितीत मक्ता संपल्यानंतर मक्तेदाराने देणे बंधनकारक राहील.या प्रकरणी या कार्यालयाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करून देण्याची जवाबदारी मक्तेदाराची राहील.

२१) शासनाकडून तसेच या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश / निर्णय यांचे पालन करण्याची जवाबदारी मक्तेदार यांची राहील.तसेच एक किंवा सर्वच मक्ते तातडीचे वेळी रद्द करून ताब्यात घेण्याचे अधिकार मा.आयुक्त जालना शहर महानगरपालिका, जालना यांचे राहतील.

२२) वरील पैकी कोणत्याही अटी व शर्ती मधील संपूर्ण अथवा अंशतः कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनात आल्यास संबंधित मक्तेदाराविरूध्द भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतूदीनुसार कार्यवाही प्रस्तावित केली जाईल.

**स्वाक्षरीत /-**
**( त्र्यंबक कांबळे )**
**उपायुक्त**
**जालना शहर महानगरपालिका**
**जालना.**